झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

## - परिपत्रक -

क्र. झोपुप्रा/प्रशा/कार्या-१/टे-२/२०४ /२०२२

दिनांक : - 9 JUN 2022

**परिपत्रक क्र.** २०४

**विषय :_ झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण अंतर्गत योजनेतील पात्र सभासदाच्या प्रथम झोपडी तोडल्याप्रमाणे जेष्ठता यादी सादर करणे बाबत.**

संदर्भ :- प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१६२ दि.२३/१०/२०१५.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून तयार झालेल्या पुनर्वसन इमारतीमधील संस्थेच्या मंजुर परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारकांना सोडतपध्दतीने सदनिका वाटप हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.१६२ च्या अनुषंगाने करण्यात येते. सदर वाटप हे प्रथम झोपडी तोडल्याच्या जेष्ठेतेनुसार पात्र सभासदास करण्यात येते.

पुनर्वसन इमारतीधील सदनिका वाटपाच्या वेळी विकासकामार्फत अशी प्रथम झोपडी तोडल्याप्रमाणे जेष्ठता यादी सादर करण्यात येते अशा यादीवर आक्षेप/हरकती करिता नोटीसद्वारे प्रसिध्द केल्यावर सदर यादीवर मोठयाप्रमाणात तक्रारी/आक्षेप/हरकती प्राप्त होतात.

पुनर्वसन इमारतीमधील सदनिका वाटप करतेवेळी अशाप्रकारच्या तक्रारी/आक्षेप/ हरकती उद्‌भवल्यास व वाटपामध्ये सुसूत्रता राहावी याकरिता विकासकाने / वास्तुविशारद यांनी आशयपत्र (LOI), मंजुरीची सुचना (IOA) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत प्राप्त झाल्यानंतर योजनेतील ज्या भागाकरिता प्रारंभ प्रमाणपत्र (C.C) प्राप्त करून घ्यावयाचे आहे अशा भागातील झोपडया निष्कासन करतेवेळी प्रथम झोपडी ज्याची तोडली आहे, अशा जेष्ठतेनुसार यादी तयार करून सदर यादी ही पुनर्वसन घटकातील इमारतीचे प्रारंभ प्रमाणपत्र (C.C) घेण्यापूर्वी सहकार व अभियांत्रिकी विभागास सादर करणे बंधनकारक राहिल. या प्रमाणे विकासकाने कार्यवाही न केल्यास विकासकाच्या योजनेस प्रारंभ प्रमाणपत्र (C.C) व पुढील परवानग्या देता येणार नाही.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत ज्या योजनेच्या पुनर्वसन घटकातील इमारतीला प्रारंभ प्रमाणपत्र (C.C) मिळाले असेल अशा योजनेबाबत विकासकाने सदर परिपत्रक निर्गमित झालेपासून परिशिष्ट-२ मधील प्रथम झोपडी तोडण्याच्या जेष्ठेतेनुसार तात्काळ यादी सादर करणे अनिवार्य राहील.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.**

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in